# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, कोकण विभाग,पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.comWebsite : http://jdhepanvel.org   दूरध्वनी व फॅक्सांबर (०२२) २७४५ ३८२०.


क्र. विससं/उशि/कोविप/भ.नि.नि/डिसीपीएस/२०२०/1237   दिनांक :१६.१०.२०२०

**परिपत्रक**

सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सदर परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की,

१. ज्या महाविद्यालयांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे G.P.F व D.C.P.S लेखाबाबतच्या सन २०१८-२०१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या माहिती भरण्याचे काम कलेले नाही. त्यांनी **G.P.F व D.C.P.S माहिती भरण्याचे काम करुन संबधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना G.P.F व D.C.P.S ची स्लीप वितरीत करण्यात यावी.**

२. सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या भ.नि.नि ची वर्गणी शेवटच्या तीन महीन्यात बंद करुन त्यांचे भ.नि.नि हिशोब अद्यावत करण्यात यावा. व त्याचा प्रस्ताव सेवानिवृत्तीपुर्वी सादर करण्याची दक्षता घेणेत यावी, तसेच परतावा/ना-परतावा अग्रीमाबाबत आपल्या महाविद्यालयास मागणी प्राप्त झाल्यास प्रस्ताव तात्काळ या कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करावा. काही महाविद्यालयांकडून वेळेत असे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने तक्रारी उदभवतात यासाठी विहितवेळी प्रदान होईल याची खबरदारी घ्यावी. काही महाविद्यालयांकडून विषयांतील प्रकरणी पत्रव्यवहार सादर करताना मागील तारखेने सादर केले जातात. एक दोन मिहिने पुर्वीची तारीख प्रस्तावावर व पत्रव्यवहारावर नमुद असते सदरची बाब हि योग्यनसून ज्या सप्ताहामध्ये प्रकरणे सादर होतील त्या सप्ताहातील तारीख नमुद असल्यासच अशी प्रकरणे स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी

३. महाविद्यालयातील जे कर्मचारी डीसीपीएस योजनेमध्ये आहेत त्यांच्या डीसीपीएस अंशदानाच्या रक्कमेचा हिशोब अद्ययावत करण्याकरीता या विभागासाठी तयार करण्यात आलेल्या डीसीपीएस सॉप्टवेअर मध्ये माहिती भरण्यासाठी यापूर्वी ब-याचवेळा या कार्यालयाकडून कळविण्यात आले होते. काही महाविद्यालयांची माहिती भरण्यात आलेली आहे. काहीनी अपूर्ण माहिती भरलेली आहे. ज्या महाविद्यालयांनी अद्याप माहिती भरलेली नाही अथवा ज्यांची माहिती अपूर्ण त्यांनी तात्काळ ही माहिती भरुन अद्ययावत करावयाची आहे. यामध्ये वेतन देयकातून कपात होणारी नियमित मासिक कपातीची रक्कम, आधीच्या महिन्याच्या वसुलीची रक्कम, तसेच चलनाद्वारे भरण्यात आलेल्या रक्कमा, ६व्या वेतन आयोगाच्या ५ हप्त्यांच्या फरकाच्या रकमा याबाबतची माहिती सोबत आणावी व वेतन देयकातून प्रत्यक्षात वजा करण्यात आलेल्या रकमांचा ताळमेळ घेण्यात यावा. हे काम पूर्ण करण्यासाठी या कामाशी संबंधित कर्मचा-यांनाच पाठविण्यात यावे.

४. प्राचार्य व या कामाशी संबधित कर्मचारी यांनी उपरोक्त विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून भ.नि.नि व डीसीपीएस लेखाबाबतची माहिती भरण्याचे काम प्राधान्याने पूर्ण करुन संबधित कर्मचा-यांना भ.नि.नि व डिसीपीएस स्लीप वितरीत करण्यात यावी.

(स्वाक्षरी) १६/१०/२०

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण कोकण विभाग पनवेल

**प्रति,**

प्राचार्य, सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागीरी व सिंधुदूर्ग

Scanned by CamScanner